Maharashtra times | Godfrey | 29|7|2019

'एसआरए' तक्रार निवारणावर बोट

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

झोपटपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये (एसआरए) अनियमितता, गैरप्रकार, परिशिष्ट-२च्या वैधतेविषयी आरोप अशा अनेक तक्रारींमुळे कित्येक अपिल प्रलंबित असूनही राज्य सरकारने अलिकडेच स्थापन केलेल्या तक्रार निवारण समितीकडून कार्यक्षमतेने काम होत नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने नुकतीच नाराजी व्यक्त केली. त्याचबरोबर अर्धन्यायिक अधिकार असलेल्या या समितीच्या कामकाजाला शिस्त लागावी आणि प्रलंबित प्रकरणांचा लवकर निपटारा व्हावा यादृष्टीने समितीच्या अध्यक्षपदी निवृत्त जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा विचार करा, असे निर्देशही न्यायालयाने मुख्य सचिवांना दिले.

समितीसाठी निवृत्त न्यायाधीशांच्या निवडीचा विचार व्हावा

मुंबईतील एका 'एसआरए' प्रकल्पातील यादासंदर्भात 'एसआरए' प्राधिकरणाने विरोधी आदेश काढल्याने अस्लम हसीमली शेख व अन्य काही झोपडीधारकांनी कायद्यातील तरतुदीप्रमाणे अपिल केले. मात्र, अपिलावर लवकर सुनावणी होत नसल्याचे गाऱ्हाणे या झोपडीधारकांनी ॲड. इम्रान फारुकी यांच्यामार्फत रिट याचिकेमार्फत मांडले. याविषयी सुनावणी घेतल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांविषयीच्या अपिलांवर सुनावणी घेण्यासाठी कोणती यंत्रणा आहे, अशी विचारणा न्या. सत्यरंजन धर्माधिकारी व न्या. संदीप शिंदे यांच्या खंडपीठाने केली होती. त्यावर उत्तर देताना अतिरिक्त मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली असून, त्यात 'एसआरए' व म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुंबई महापालिका व एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त हे सदस्य असल्याची माहिती राज्य सरकार व 'एसआरए'च्या वकिलांनी दिली. त्यानंतर या समितीच्या कामकाजाविषयी

हे अधिकारी आपल्या मुख्य कामांमध्ये सातत्याने व्यस्त राहत असल्याने या समितीचे कामकाज आठवड्यातून एकदाच शनिवारी होत असल्याची माहितीही सुनावणीदरम्यान समोर आली. ते ऐकून खंडपीठाने तीव्र आश्चर्य व्यक्त केले.

'हजारो प्रकरणे प्रलंबित राहत असताना ही समिती एकदाच काम करत असेल तर ते धक्कादायक आहे. केवळ अधिकारी आपल्या कामात सतत व्यस्त राहत आहेत म्हणून 'एसआरए'च्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी सर्वोच्च असलेल्या या समितीसमोर प्रकरणे प्रलंबित राहून चालणार नाही. झोपडीधारकांनी प्रत्येक वेळी न्यायालयात यावे आणि नंतर न्यायालयाने आदेश काढल्यावर त्यांच्या प्रकरणाची सुनावणी समितीकडून प्राधान्याने घेतली जावी, हे अपेक्षित नाही. समितीने जी अपिल दाखल झाली आहेत, त्यांची तारखेप्रमाणे क्रमशः सुनावणी घ्यायला हवी. तसेच त्याविषयी पूर्ण पारदर्शकता ठेवून प्रलंबित प्रकरणांची माहिती आपल्या वेबसाइटवर द्यायला हवी', असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

तसेच या समितीवर निवृत्त जिल्हा न्यायाधीश नेमल्यास कामकाजाला शिस्त येईल आणि अपिलातील प्रकरणांचा निपटारा जलद होऊ शकेल. त्यामुळे राज्याच्या मुख्य सचिवांनी याविषयी विचार करावा, असे निर्देश खंडपीठाने दिले.

'गृहनिर्माण'वर महापरिषद

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

बांधकाम क्षेत्रातील आव्हानांवर होणार चर्चा

मुंबईसह राज्यात प्रधानमंत्री आवास योजना, परवडणाऱ्या घरांची उभारणी यांसह अन्य गृहनिर्माण प्रकल्पांना वेग येण्याच्या दृष्टीने राज्याच्या गृहनिर्माण विभागाकडून जुलैअखेरीस वा ऑगस्टमध्ये राज्यस्तरीय गृहनिर्माण महापरिषद आयोजित केली जाणार आहे. त्यात बांधकाम क्षेत्रात नव्या तंत्रज्ञानाचा समावेश, आव्हाने, उपाय आदी विषयांवर चर्चासत्रे, परिसंवादांचा समावेश असेल. गृहनिर्माण धोरणास वेग देण्यासाठी ही परिषद भरवली जाणार असल्याचे सांगण्यात येते.

मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींचा समूह पुनर्विकास, पंतप्रधान आवास योजना, ग्रामीण गृहनिर्माण योजना, झोपडपट्टी पुनर्वसन योजना, म्हाडा, सिडको, हडको, शिवशाही प्रकल्प, धारावी प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर गृहबांधणी अपेक्षित आहे. या सर्व प्रकल्पांना गती देण्यासाठी आरखडा तयार केला जात आहे. त्याअनुषंगाने महापरिषदेत विविध विषयांचा अंतर्भाव होणार आहे. गृहनिर्माण क्षेत्रातील अधिकारी, तज्ज्ञ यांनाही त्यात सामावून घेतले जाईल. तसेच, राज्यातील विविध भागातील मुख्य अधिकाऱ्यांनाही पाचारण [illegible] इमारतींच्या समूह पुनर्विकासातील अडथळे दूर करण्यासाठी त्यांचे क्लस्टर करून, पुनर्विकासातील सर्व अडथळे दूर करण्यासाठी सर्वंकष कायदा करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच स्पष्ट केले आहे. त्यात जुन्या, धोकादायक इमारतींच्या मालकांकडून पुनर्विकासास होणारा विरोध लक्षात घेत लवकरच कायद्याचीही तरतूद केली जाणार आहे.

धोकादायक इमारतींसाठी दिलासा

साधारणपणे उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करताना रहिवासी, विकासक, मालकांचा अडथळा येतो. ही त्रुटी भरून काढण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यात नवीन कायद्याची भर पडल्यास धोकादायक इमारतींचा पुनर्विकास होऊन इमारती कोसळण्याचा धोकाही टळू शकेल. गृहनिर्माणमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी नुकतीच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) कार्यालयास भेट देऊन आढावा घेतला [illegible]

फेअरकेम स्पेशालिटी लिमिटेड

नोंद. कार्यालय: १२४, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१ भारत
कार्य व कार्यालय: २५३/पी व ३१२, गाव चेखला, सानंद-कडी हायवे,
तालुका सानंद, जि. अहमदाबाद - ३८२११५, भारत.
CIN: L15140MH1985PLC286828
ईमेल आयडी: cs@fairchem.in वेबसाईट: www.fairchem.in

सूचना

सेबी (एलओडीआर) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ च्या अन्वये याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवार, ८ ऑगस्ट, २०१९ रोजी घेण्याचे निर्धारित आहे ज्यात ३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही करिता एकल आणि एकत्रित अ-लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घ्यायचे आहेत व मान्यता द्यायची आहे. सदर सूचना कंपनीची वेबसाईट http://www.fairchem.in येथे आणि स्टॉक एक्सचेंजेसची वेबसाईट http://www.bseindia.com आणि http://www.nseindia.com वर सुद्धा पाहता येईल.

ठिकाण: चेखला, ता. सानंद
जिल्हा अहमदाबाद
दिनांक: जुलै २६, २०१९

फेअरकेम स्पेशालिटी लिमिटेड करिता
राजेश हर्षे
मुख्य वित्तीय अधिकारी आणि कंपनी सचिव

गॉडफ्रे फिलीप्स इंडिया लिमिटेड

CIN: L16004MH1936PLC008587
नोंद. कार्यालय: 'मार्कोपोलो इमारत', तळ मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लालबाग, मुंबई-४०००३३.
दूरध्वनी: ०२२-६१९५ २३००/ फॅक्स: ०२२-६१९५ २३११
कॉर्पो कार्यालय: ओमॅक्स स्क्वेअर, प्लॉट क्र. १४, जसोला जिल्हा केंद्र, जसोला,
नवी दिल्ली - ११००२५. दूरध्वनी: ०११-६११९९३००, २६८३२१५५
ई-मेल: isc-gpi@modi.com / वेबसाईट: www.godfreyphillips.com

आयईपीएफ प्राधिकरणाला समभागांचे हस्तांतरण करण्यासाठी कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४ (६) अंतर्गत समभागधारकांना सूचना

कंपनीच्या सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४(६) च्या तरतुदींच्या नियमानुसार, सर्व समभाग ज्या संदर्भात ७ सलग सात किंवा त्यापेक्षा जास्त वर्षे लाभांशाचा दावा न केलेले/भरणा न केलेले, भारत सरकारद्वारे स्थापित गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) ला हस्तांतरीत करण्याची आवश्यकता आहे.

तथापि, आयईपीएफ प्राधिकरणाच्या (लेखांकन, लेखा, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६ च्या तरतुदीनुसार, सुधारित (आयईपीएफ नियम) संबंधित सदस्य, ज्यांचे सलग सात वर्षे लाभांश मिळालेले नाहीत/भरणा केलेले नाहीत, अशांना भरणा न केलेल्या/लाभांश न मिळालेल्या दाव्यासाठी संधी प्रदान करण्यात येत आहे. पत्राद्वारे पत्राच्या खाली त्यांच्या स्वाक्षरी सोबत पॅन कार्डची स्व-साक्षांकित प्रत एकत्रितपणे आमच्या रजिस्ट्रार आणि हस्तांतरण अभिकर्ता (आरटीए) यांचे कार्यालय, मेसर्स लिंक इनटाईम इंडिया प्रा. लि., सी-१०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३, दूर. क्र. ०२२-४९१८६२००, ई-मेल-rnt.helpdesk@linkintime.co.in येथे अद्यावत २६ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत पोहचतील अशा रितीने पाठवावेत. कंपनीने आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याकरिता आवश्यक अशा सदस्यांचे तपशिल आणि शेअर्सची संख्या, कंपनीच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध करून दिलेले आहे. कंपनी सदर आयईपीएफ निर्देशित तरतुदीनुसार समभाग हस्तांतरणासाठी योग्य ती पावले उचलेल. एकदा का कंपनीव्दारा आयईपीएफ प्राधिकरणाला समभागाचे हस्तांतरण केले, अशा समभागासंबधात आयईपीएफ प्राधिकरणाच्या संबंधित सदस्यांकडून उपरोक्त आयईपीएफ नियमाअंतर्गत निर्धारित प्रक्रियेचा वापर करून वेळोवेळी सुधारीत किंवा पुन: सांगण्यात आल्यानुसार दावा केला जाऊ शकतो.

या संबंधी संबंधित सदस्यांना कंपनीच्या रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण अभिकर्ता (आरटीए) कडून त्यांच्या अंतिम ज्ञात नोंदणीकृत/उपलब्ध पत्त्यावर वैयक्तिक पत्रे पाठविण्यात आलेली आहेत.

वर्ष २०११-१२ त्या पुढील च्या संदर्भात, दावा न केलेले/न भरलेले लाभांशाचे तपशिल कंपनीकडे उपलब्ध आहेत. जे दावा न केलेले लाभांश अंतर्गत त्याचे तपशिल कंपनीच्या संकेतस्थळ https://www.godfreyphillips.com/company/investor-relation/financials/investor-information/ वर उपलब्ध आहेत. सर्व सदस्यांना सल्ला देण्यात येतो की, अशा दावा न केलेल्या/न भरलेल्या लाभांशांवर त्वरित त्यांचे हक्क मागावेत.

सदस्यांनी ह्या बाबी संबंधित कोणत्याही चौकशीसाठी कंपनी सचिव किंवा आमचे आरटीए (मेसर्स लिंक इनटाईम इंडिया प्रा. लि.) यांना पत्र/ई-मेल अतवून संपर्क करू शकतात.

गॉडफ्रे फिलीप्स इंडिया लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
संजय गुप्ता
कंपनी सचिव
[illegible]

मुंबई : आज [illegible]
[illegible] राष्ट्रीय [illegible]
[illegible] कार्यक्रमाने सुरुवात
[illegible] या आजारासंदर्भात जागृती

मा
फॅक्स नं. : ०२२
३० जून, २०

प्र. क्र.	
१	प्रचलनातून एकूण उत्पन्न
२	कालावधीकरिता निव्वळ नफा (क
३	करपूर्वी कालावधीकरिता निव्वळ
४	सहकारीता निव्वळ नफा/(तोटा)
५	करापश्ची कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) नंतर)
६	करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) नंतर आणि मायनॉरि
७	कालावधीकरिता एकूण व्यापक उ इतर व्यापक उत्पन्न (करा नंतर)
८	भरणा केलेले समभाग भांडवल (द
९	प्रती भाग मिळकत (दर्शनी मूल्य
	१. बेसिक प्रती भाग मिळकत (रु.
	२. डायल्यूटेड प्रती भाग मिळकत

मर्व कालावधीकरिता बेसिक आणि

मूचना :

१. उपरोक्त निष्कर्षांचा लेखा स
मान्यता देण्यात आली आहे.
डेलॉईट हॅस्कीन्स आणि सेल
२. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने आ
तारखेस संचयी परिणामासह पू
पट्टेदाराच्या वाढीव दराचा वापर
समतुल्य रकमेच्या आधारावर
माहितीचा पुनर्वापर न करता,
ला संपलेल्या तिमाही आणि ३१
म्हणून समाविष्ट असलेल्या लेख
अधिकार' मालमत्ता आणि म.
या दृष्टिकोनातून, ऑपरेटिंग लि
त्यानुसार चालू तिमाही करिता
तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांमध
लाख वाढ झाली आहे आणि
३. एकल (स्टॅंडअलोन) वित्त

एकूण उत्पन्न (इतर उत्पन्न स
करपूर्व नफा
करा नंतर निव्वळ नफा

४. उपरोक्त, सेबी (लिस्टिंग
अलेखापरिक्षित वित्तीय
nseindia.com आणि

ठिकाण : मुंबई
दिनांक : २६ जुलै, २०१९

Scanned by CamScanner